# ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (व्ही एस टी एफ)

## जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सोलापूर-४१३००३

Maharashtra Village Social Transformation Foundation
An Initiative of the People of Maharashtra

## "कृषी अवजार बँक' स्थापन करण्यासाठी प्रस्ताव मागविणे

**ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन** अंतर्गत **"आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण"** या प्रकल्पांतर्गत, **सोलापूर** जिल्ह्यातील, **माढा, मोहोळ, उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर** तालुक्यांमध्ये, प्रति तालुका ३ प्रमाणे **"कृषी अवजार बँक"** स्थापन करण्यासाठी नोंदणीकृत समुदाय आधारित संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी नोंदणीकृत समुदाय आधारित संस्थांनी सादर करावयाच्या अर्जाचा नमूना व मार्गदर्शक सूचना **माढा, मोहोळ, उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर या तालुक्यांच्या तालुका कृषी अधिकारी** यांच्या कार्यालयात दिनांक **२४ ऑगस्ट २०२६** पासून उपलब्ध असतील. तसेच ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन च्या **https://www.mvstf.org/** आणि जिल्हा परिषद **सोलापूर** यांच्या **https://www.zpsolapur.gov.in/** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**अर्ज स्विकारण्याचा कालावधी: ३१ ऑगस्ट २०२६ ते २१ सप्टेंबर २०२६** (कार्यालयीन वेळेत)

सदर योजनेत कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय पूर्णतः / अंशतः बदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन यांच्याकडे राखीव आहेत.

**- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

महाराष्ट्र शासन

CIN No. U74999MH2017NPL289558

डॉ.उमाकांत दांगट
मुख्य कार्यकारी अधिकारी

जाक्र.मग्रासापअ ०८२०२६/मुकाअ/ २०१
ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन
१५, ठाकरसी हाऊस मुंबई पोर्ट ट्रस्ट
बिल्डिंग, दुसरा मजला, जेएन हेरेडिया
रोड, बलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई-०१
दिनांक:- १८ /०८/२०२६

**विषय:** "आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकट करणे" ह्या प्रकल्पा अंतर्गत "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना.

**संदर्भ:**

१. ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन व सर दोराबजी टाटा ट्रस्ट यांचेमधील भागीदारी
२. या कार्यालयाचे पत्र - जा.क्र.मग्रासापअ ०४२०२६/मुकाअ/५९ दिनांक ०८/०४/२०२६
३. संचालक कृषी यांच्या सोबत आयोजित दिनांक ०१/०६/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये, सदर प्रकल्पांतर्गत खालील निवडक जिल्हा व तालुक्यातील प्रति तालुका ३ समुदाय आधारित संस्थाची निवड करावयाची आहे असे कळविण्यात आले होते.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका |
|---|---|---|
| १ | सोलापूर | दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, माढा |
| २ | लातूर | अहमदपूर, जळकोट, औसा |
| ३ | धाराशिव | तुळजापूर |
| ४ | गडचिरोली | आरमोरी, गडचिरोली |

सदर कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने दिनांक १ जुन २०२६ रोजी संचालक, कृषी, विभागीय संचालक-कृषी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांचे सोबत आयोजित बैठकीत प्रकल्पातील "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचनांची आवश्यकता आहे, असे निदर्शानास आले असल्यामुळे राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करून मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या आहेत.

प्रकल्पातील ४ जिल्ह्यातील १० निवडक तालुक्यांतील प्रति तालुका ३ या प्रमाणे समुदाय आधारित संस्थाच्या (सी.बी.ओ.) माध्यमातून "उपजीविका समूह विकास"
करण्याचे नियोजित आहे. तरी, निवडक तालुक्यातील प्रति तालुका ३ या प्रमाणे एकूण ३० शेतकरी उत्पादक कंपन्या/संस्था/ बचत गट - ग्राम संघ (VOs)/ समूह-स्तरीय प्रभागसंघ ( समुदाय आधारित संसाधन संस्था (CMRC) यांसारख्या 'समुदाय-आधारित संस्थांची (CBOs) ची निवड करावयाची आहे.

सदर प्रकल्पाचा मुख्य घटक म्हणून निवडण्यात येणा-या ३० समुदाय आधारित संस्था यांना "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) विकसीत करून, संस्थेच्या कार्यक्षेत्रात 'सेवा पुरवठादार' (Service Provider) म्हणून रूपांतरित करुन, स्थानिक पातळीवर गावांसाठी व सभासदांसाठी शेतीचा उत्पादन खर्च कमी

करुन, उत्पन्न वृद्धिंगत करण्याच्या अनुषंगाने, आर्थिक संधी आणि सुविधांची शाश्वतता निर्माण करण्यासाठी "स्थानिक परिसंस्था" विकसित करावयाची आहे.

सदर प्रकल्पातील "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठीच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना, जिल्हा/तालुका स्तरावर करावयाची कार्यवाही, प्रस्ताव मागविण्यासाठीचा अर्ज, प्रस्तावाची छाननी, गुणांकन पद्धती, व प्रस्ताव मंजुरीस पाठविण्याची कार्यपद्धती सहपत्रीत करण्यात येत आहे.

तरी, सदर कामी आपले स्तरावरून आपले अधिनस्त संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांना **ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन व सर दोराबजी टाटा ट्रस्ट अर्थ सहाय्यित** "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक सहपत्रीत मार्गदर्शक सूचना नुसार विहित कालावधीत राबविण्याबाबत निर्देशित करण्यात यावे, अशी विनंती आहे.

**सहपत्र: "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक मार्गदर्शक सूचना**

आपला स्नेहांकित

उ.दा. [signature] 18/08/2026.

(उमाकांत दांगट)

प्रति,

आयुक्त, कृषी,
कृषी आयुक्तालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे

संचालक, कृषी-विस्तार,
कृषी आयुक्तालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे

**प्रत माहितीस्तव :**

१. मा. व्यवस्थापकीय संचालक, ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन, मुंबई
२. मा. प्रधान सचिव, कृषी, मंत्रालय, मुंबई

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :**

१. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा अभियान परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, सोलापूर, धाराशिव व गडचिरोली
२. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह अध्यक्ष, जिल्हा अभियान परिषद, जिल्हा परिषद कार्यालय लातूर, सोलापूर, धाराशिव व गडचिरोली
३. विभागीय कृषी सहसंचालक, कृषी विभाग, लातूर, पुणे व नागपूर
४. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, लातूर, सोलापूर, धाराशिव व गडचिरोली
५. तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, अहमदपूर, औसा, जळकोट, तुळजापूर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, माढा, मोहोळ, गडचिरोली व आरमोरी
६. प्रादेशिक समन्वयक, व्हीएसटीएफ, सोलापूर, गडचिरोली, लातूर व धाराशिव
७. जिल्हा कार्यक्रम समन्वयक, व्हीएसटीएफ, सोलापूर, लातूर व धाराशिव

# महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास व पंचायत राज विभाग
# ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन

"आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये
ग्रामीण उपजीविका बळकटीकरण" प्रकल्प
अंतर्गत

## “कृषी अवजार बँक” (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठीच्या

# मार्गदर्शक सूचना

संदर्भ:

१. या कार्यालयाचे पत्र - जा.क्र.मग्रासापअ ०४२०२६/मुकाअ/५९ दिनांक ०८/०४/२०२६

२. संचालक कृषी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दिनांक ०१/०६/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

३. दिनांक ३ ते ५ ऑगस्ट २०२६ "आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण" प्रकल्प अंतर्गत संपन्न झालेली कार्यशाळा

# “कृषी अवजार बँक” (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी/ तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग यांचे कार्यालयाकडून करावयाच्या कार्यवाहीसाठीच्या मार्गदर्शक सूचना | ५ |
| १.१. | ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन संस्थेची माहिती | ५ |
| १.२. | आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण" प्रकल्पाची पार्श्वभूमी | ५ |
| १.३. | प्रकल्प कार्यक्षेत्र: | ५ |
| २ | प्रकल्पाचा उद्देश व उद्दिष्ट्ये | ६ |
| ३. | सी.बी.ओ. निवडीचे निकष - | ७ |
| ३.१. | समुदाय आधारित संस्था: | ७ |
| ३.२. | समुदाय आधारित संस्था नोंदणी: | ७ |
| ३.३. | सभासद संख्या: | ८ |
| ४. | संस्था निवडीचा प्राधान्यक्रम: | ८ |
| ४.१. | मिशन महाग्राम व १००० गाव विकास कार्यक्रम: | ८ |
| ४.२. | स्मार्ट प्रकल्प: | ८ |
| ४.३. | नजीकच्या गावामधील समुदाय आधारित संस्था: | ८ |
| ४.४. | आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष: | ८ |
| ५. | समुदाय आधारित संस्था निवडीची कार्यपद्धती – | ९ |
| ५.१. | जाहिरात व प्रसिद्धी: | ९ |
| ५.२. | निवड प्रक्रियेसाठीचे वेळापत्रक - | ९ |
| ५.३. | अर्ज स्विकारणे : | १० |
| ५.४. | अर्जांची छाननी व गुणांकन: | १० |
| ५.५. | निवड झालेल्या संस्थांची प्रत्यक्ष पडताळणी - | ११ |
| ५.६. | अंतिम निवड: | ११ |
| ५.७ | करारनामा: | ११ |
| **परिशिष्ट** | | |
| १ | मिशन महाग्राम व १००० गाव विकास कार्यक्रमातील व्हीएसटीएफ ची गावे | १२ |
| २ | “कृषी अवजार बँक” (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठीच्या समुदाय आधारित संस्थेने करावयाचा अर्ज | १६ |
| ३ | शेती उत्पादन खर्चात बचत करणे आणि कृषी अवजारे वाजवी दरात उपलब्ध करून देण्याबाबत हमीपत्र | २३ |
| ४ | क्षमतावाढीसाठीची शिबिरे व प्रशिक्षणास उपस्थित राहण्याबाबत हमीपत्र | २४ |
| ५ | मागील ३ वर्षात कृषी अवजार बँक घटकाचा लाभ घेतला नसल्याबाबतचे हमीपत्र | २५ |
| ६ | अर्ज सादर करण्यासाठीच्या अटी व शर्ती | २६ |
| ७ | अर्ज छाननीसाठीचे गुणांकन | २७ |

# "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना

## १. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी/ तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग यांचे कार्यालयाकडून करावयाच्या कार्यवाहीसाठीच्या मार्गदर्शक सूचना

### ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन संस्थेची माहिती

"ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन" ही संस्था ग्राम विकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासनाची कंपनी कायद्याअंतर्गत कलम-८ खाली स्थापित करण्यात आलेली कंपनी आहे. ही संस्था राज्य शासनाची विशेष उद्देश कंपनी (Special Purpose Vehicle) म्हणून सन २०१७ मध्ये स्थापन करण्यात आली आहे. ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन संस्थेचा मुख्य उद्देश हा राज्यातील कॉर्पोरेट सामाजिक दायित्व निधी (CSR) आणि शासकीय योजनांच्या कृती संगमातून राज्यातील ग्रामीण भागाचा शाश्वत विकास साध्य करणे हा आहे. दिनांक ८ एप्रिल २०२२ व दिनांक ६ जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात, "मिशन महाग्राम" हा कार्यक्रम सन २०२२ ते २०२९ या कालावधीत राबविण्यात येत आहे. "ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन संस्थेची अधिक माहिती www.mvstf.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण" प्रकल्पाची पार्श्वभूमी

ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन व सर दोराबजी टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त भागिदारीतून, राज्यातील ४ जिल्ह्यातील, निवडक १० तालुक्यांमध्ये "आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण" प्रकल्प राबविण्यात येत आहे.

### प्रकल्प कार्यक्षेत्र:

सदर प्रकल्पात खालील जिल्हे व तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका |
|---|---|---|
| १ | सोलापूर | दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, माढा |
| २ | लातूर | अहमदपूर, जळकोट, औसा |
| ३ | धाराशिव | तुळजापूर |
| ४ | गडचिरोली | आरमोरी, गडचिरोली |

उपरोक्त जिल्ह्यातील व तालुक्यांतील प्रति तालुका ३ या प्रमाणे समुदाय आधारित संस्थाच्या (सी.बी.ओ.) माध्यमातून "उपजीविका समूह विकास" (Livelihood Cluster Development) करण्याचे नियोजित आहे. तरी, उपरोक्त नमूद तालुक्यातील प्रति तालुका ३ या प्रमाणे एकूण ३० शेतकरी उत्पादक

कंपन्या/संस्था/ बचत गट - ग्राम संघ (VOs)/ समूह-स्तरीय प्रभागसंघ (CLFs)/समुदाय आधारित संसाधन संस्था (CMRC) यांसारख्या 'समुदाय-आधारित संस्थांची (CBOs) ची निवड करावयाची आहे.

सदर प्रकल्पाचा मुख्य घटक म्हणून निवडण्यात येणा-या ३० समुदाय आधारित संस्था यांना "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) विकसीत करून, संस्थेच्या कार्यक्षेत्रात 'सेवा पुरवठादार' (Service Provider) म्हणून रूपांतरित करुन, स्थानिक पातळीवर गावांसाठी व सभासदांसाठी शेतीचा उत्पादन खर्च कमी करुन, उत्पन्न वृद्धिंगत करण्याच्या अनुषंगाने, आर्थिक संधी आणि सुविधांची शाश्वतता निर्माण करण्यासाठी "स्थानिक परिसंस्था" (Ecosystem) म्हणून विकसित करण्यात येणार आहे.

**या प्रकल्पांतर्गत, समुदाय आधारित संस्थांना कृषी अवजारे/उपकरणे/ संयंत्रे उपलब्ध करुन दिल्याने त्या परिसरातील गरजू शेतक-यांना एकाच ठिकाणी अनेक अवजारे गरजेनुसार, माफक दरात भाडे तत्वावर उपलब्ध होऊ शकतील.**

## २. प्रकल्पाचा उद्देश व उद्दिष्ट्ये

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील, विशेषतः आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमधील उपजीविकेची साधने अधिक बळकट करुन शाश्वत आर्थिक विकास करणे हा आहे.

प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

- **शासकीय योजनांचा कृतीसंगम (Convergence):** प्रकल्पाच्या घटकास पुरक अशा शासकीय योजना व कार्यक्रमांच्या कृतीसंगमातून प्रति समुदाय आधारित संस्थांना किमान रु. १५ लाखांपर्यत योजनांची जोड देऊन प्रकल्पाची व्याप्ती वाढवणे.
- **सामाजिक दायित्व घटक:** प्रकल्पाचा मुख्य घटक म्हणून निवडण्यात येणा-या ३० समुदाय आधारित संस्था यांना "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) विकसीत करून, संस्थेच्या कार्यक्षेत्रात 'सेवा पुरवठादार' (Service Provider) म्हणून रूपांतरित करणे. तसेच स्थानिक पातळीवर गावांसाठी व सभासदांसाठी शेतीचा उत्पादन खर्च कमी करुन, उत्पन्न वृद्धिंगत करण्याच्या अनुषंगाने, आर्थिक संधी आणि सुविधांची शाश्वतता व "स्थानिक परिसंस्था" (Ecosystem) **विकसित करण्यासाठी ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन कडून स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात येईल.**
- सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करत असताना संस्थानिहाय पायाभूत सर्वेक्षण व सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) तयार करण्यात येईल. प्रत्येक संस्थेसोबत स्वतंत्रपणे करारनामा करण्यात येईल.

- **उपजीविका संधींबाबत क्षमता बांधणी:** समुदाय आधारित संस्था पातळीवरील बैठकांच्या/प्रशिक्षणांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रति संस्था ५० सभासद या प्रमाणे ३० संस्थामधील किमान १,५०० सभासदांना उपजीविकेच्या शाश्वत संधींबाबत सविस्तर माहिती देऊन त्यांची क्षमता बांधणी करणे. तसेच समुदाय आधारित संस्थाचे प्रति संस्था ५ या प्रमाणे किमान १५० संचालकांना प्रशिक्षण देवून त्यांची क्षमता बांधणी करणे.
- **शेती यांत्रिकीकरणास प्रोत्साहन:** ग्रामीण भागात शेतीस आवश्यक यांत्रिकीकरण सुविधा निर्माण करून अशा सुविधा (अवजारे) माफक दरात उपलब्ध करून देणे.
- **कृषी अवजार बँक सुविधा:** स्थानिक स्तरावर कृषी अवजार बँकेच्या माध्यमातून सभासदांसाठी यांत्रिकीकरण वापर सुविधा तयार करणे.
- **समुदाय आधारित संस्था सभासदांसाठी सुविधा/लाभ/बचत:** कृषी अवजार बँकेच्या माध्यमातून सभासदांसाठी आधुनिक यंत्रांची उपलब्धता माफक दरामध्ये वापरासाठी मिळू शकल्यामुळे सुविधा/लाभ/बचत यांचे माध्यमातून प्रति सभासद वार्षिक उत्पादन खर्चात किमान रु. ६,००० पर्यंत घट करणे अपेक्षित आहे.
- **महिला शेतकरी सहभाग वाढविणे:** सन २०२६ हे “आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष” असल्याने महिला सभासद अधिक असणाऱ्या संस्थांना प्राधान्य देवून सहभाग वाढविणे.
- **समुदाय आधारित संस्थांचे सक्षमीकरण:** निवडण्यात येणा-या समुदाय आधारित संस्थांना केवळ लाभार्थी न ठेवता, त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात सक्षम '**सेवा पुरवठादार**' **(Service Provider)** म्हणून विकसित करणे आणि त्यांना स्वावलंबी बनविणे.

# ३. सी.बी.ओ. निवडीचे निकष -

## ३.१. समुदाय आधारित संस्था:

- या प्रकल्पासाठी, समुदाय आधारित संस्था म्हणजे, अ) शेतकरी उत्पादक कंपन्या (FPC) / (FPO) संस्था, ब) शेतकरी गट, क) बचत गटांचे ग्राम संघ (VO), ड) बचत गटांचे प्रभागसंघ (CLF), इ) बचत गटांच्या समुदाय आधारित संसाधन संस्था (CMRC), यापैकी कोणतीही संस्था पात्र ठरू शकते.

## ३.२ समुदाय आधारित संस्था नोंदणी:

- या प्रकल्पात भाग घेणा-या समुदाय आधारित संस्था या शासनाच्या विभागाकडे नोंदणीकृत असाव्यात. उदा:- कृषी विभाग, आत्मा, MSRLM (उमेद), माविम, अथवा शासनाचे इतर विभाग.

## ३.३ सभासद संख्या:

- सदर प्रकल्पासाठी निवडण्यात येणा-या संस्थेच्या सभासदांची संख्या किमान १०० असणे अनिवार्य आहे. संस्थेच्या सभासदांची संख्या किमान १०० असतील तरच अर्ज करण्यास पात्र होऊ शकेल.

# ४. संस्था निवडीचा प्राधान्यक्रम:

## ४.१. मिशन महाग्राम व १००० गाव विकास कार्यक्रम:

- ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या, **१००० गाव विकास कार्यक्रम** (टप्पा -१), "**मिशन महाग्राम" (टप्पा-२)** या अंतर्गत समाविष्ट असलेल्या गावांमधील संस्थां असल्यास पडताळणी करून घ्यावी.

  ***(ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (VSTF) टप्पा १ व २ मध्ये समाविष्ट असलेल्या गावांच्या यादी करिता परिशिष्ट – १ पहावे.)***

## ४.२. स्मार्ट प्रकल्प:

- मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (**स्मार्ट**) प्रकल्पांतर्गत अनुदान प्राप्त असल्यास संस्थांची अनुदान प्राप्त आहे की नाही याची पडताळणी करून घ्यावी.

## ४.३. नजीकच्या गावामधील समुदाय आधारित संस्था:

- वरील निकष क्र.४.१ व ४.२ मध्ये समुदाय आधारित संस्था उपलब्ध नसल्यास, नजीकच्या गावामधील (ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन अंतर्गत समाविष्ट गावाजवळील, स्मार्ट प्रकल्प मंजूर असलेल्या गावा जवळील) समुदाय आधारित संस्था असल्यास त्याची पडताळणी करून घ्यावी.

## ४.४. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष:

- सन २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष असल्याने, प्रत्येक तालुक्यातील, निवडण्यात येणाऱ्या तीन समुदाय आधारित संस्था पैकी किमान एका महिला आधारित समुदाय संस्थेची निवड करण्यात यावी. तथापि, एखाद्या तालुक्यात महिला आधारित समुदाय संस्था उपलब्ध न झाल्यास अन्य संस्थेची निवड करता येईल.

# ५.समुदाय आधारित संस्था निवडीची कार्यपद्धती –

समुदाय आधारित संस्थेची निवड करण्यासाठी खालील प्रक्रियेचा अवलंब करण्यात यावा.

## ५.१ जाहिरात व प्रसिद्धी:

- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (सर्व संबंधित) यांनी, प्रकल्प कार्यक्षेत्रातील सर्वाधिक खपाच्या वर्तमानपत्रात, समुदाय आधारित संस्थेकडून प्रस्ताव मागविण्याची जाहीरात (कमीत कमी जागेत) शासकिय दरानुसार प्रसिद्ध करावी. सदरच्या जाहिरातीची खर्च प्रतिपूर्ती शासकिय दरानुसार, ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन च्या राज्य कार्यालयाकडून करण्यात येईल.
- वर्तमानपत्रातील जाहिराती व्यतिरिक्त, सदर प्रकल्पाची प्रसिद्धी ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन च्या संकेतस्थळावर करण्यात येईल. तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) तथा नोडल अधिकारी व्ही.एस.टी.एफ. यांच्या मदतीने संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करावी.
- ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन अंतर्गत क्षेत्रिय पातळीवर कार्यरत असणा-या प्रादेशिक समन्वयक, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, तालुका समन्वयक यांनी प्रसिद्धी व प्रचारासाठी आवश्यक ती मदत करावी.
- अर्जाचे नमुने व अर्जासोबत सादर करावयाच्या परिशिष्टांचे नमुने, ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन च्या संकेतस्थळावर (www.mvstf.org) व संबंधित जिल्हा परिषदांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध करुन दिले जातील.

## ५.२ निवड प्रक्रियेसाठीचे वेळापत्रक -

| अ.क्र. | विवरण | मुदत दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिद्ध करणे | दिनांक २४ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०२६ |
| २ | तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावयाचा कालावधी<br>अर्ज स्वीकारण्याचा सुरुवातीचा दिनांक व अंतिम दिनांक | दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ ते दिनांक २१ सप्टेंबर २०२६ कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ३ | प्राप्त अर्जांची तालुका स्तरावर छाननी करणे. | २२ सप्टेंबर २०२६ ते २८ सप्टेंबर २०२६ |
| ४ | छाननी केलेले अर्ज अंतिम मंजुरी साठी ग्रा.सा.प.फाउंडेशन च्या राज्य कार्यालयास पाठविणे. | ३० सप्टेंबर २०२६ ते ६ ऑक्टोबर २०२६ |
| ५ | राज्य स्तरावर समुदाय आधारित संस्थांच्या प्रस्तावास मान्यता देणे. | १३ ऑक्टोबर २०२६ |
| ६ | ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन व समुदाय आधारित संस्थांसोबत करारनामा | १५ ऑक्टोबर २०२६ ते २२ ऑक्टोबर २०२६ |

## ५.३ अर्ज स्विकारणे :

- सदर प्रकल्पातील कृषी अवजार बँकेचा लाभ घेण्यास इच्छुक समुदाय आधारित संस्थांकडून विहित नमुन्यात अर्ज, प्रकल्प आराखडा आणि आवश्यक कागदपत्र, संबंधित तालुक्यांच्या **तालुका कृषी अधिकारी** यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ ते दिनांक २१ सप्टेंबर २०२६ या दरम्यान कार्यालयीन वेळेपर्यंत स्विकारावेत. **(अर्जाच्या नमुन्यासाठी परिशिष्ट -२ पहा).** विहित कालावधी (अर्ज स्वीकारण्याचा सुरुवातीचा दिनांक व अंतिम दिनांक) अगोदर अथवा नंतर सादर करण्यात आलेले कोणतेही प्रस्ताव विचारत घेण्यात येवू नयेत.

## ५.४ अर्जांची छाननी व गुणांकन:

- समुदाय आधारित संस्थेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी, प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांची तपासणी, सोबत जोडलेल्या गुणांकन **परिशिष्ट ६** मधील निकषाप्रमाणे गुणांकन करुन प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी सक्षम प्राधिका-याकडे सादर करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठित करण्यात यावी.

| **छाननी समिती रचना** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **अधिकारी** | **पद** |
| १ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तथा अध्यक्ष तालुका अभियान परिषद, ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन | अध्यक्ष |
| २ | तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग | सह अध्यक्ष |
| ३ | प्रादेशिक समन्वयक/ जिल्हा कार्यक्रम समन्वयक, ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन | सदस्य - सचिव |
| ४ | जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन राज्य कार्यालयाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | विस्तार अधिकारी – कृषी, पंचायत समिती | सदस्य |

- तालुका स्तरावर गठीत करण्यात येणा-या छाननी समिती ने सर्व अर्जांची आपल्या स्तरावरुन छाननी करुन गुणांकन करावे. त्याचा प्रस्ताव, गुणांकन तक्ता, इतिवृत्त व स्वयंस्पष्ट अभिप्रायासह समुदाय आधारित संस्थांचे मूळ प्रस्ताव ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन च्या राज्य कार्यालयास पाठवावे. राज्य कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा अभियान परिषद, (ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन), मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह-अध्यक्ष, जिल्हा अभियान परिषद, (ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन) व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना माहिती साठी पाठवावी.

- जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्या कडून आलेल्या प्रस्तावाची संक्षिप्त तपासणी करुन तालुका कृषी अधिकारी यांच्या कडून शिफारसित केलेल्या समुदाय आधारित संस्थांची निवड योग्य असल्याची खात्री करावी आणि त्यात काही त्रुटी असल्यास ७ दिवसाच्या आत संबंधित तालुक्यांचे तालुका कृषी अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.सा.प.फाउंडेशन यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

## ५.५ निवड झालेल्या संस्थांची प्रत्यक्ष पडताळणी -

- जिल्हा कार्यालयाकडून प्रस्तावित केलेल्या समुदाय आधारित संस्थांना राज्य स्तरिय समिती, प्रत्यक्ष संस्थेच्या ठिकाणी भेट देईल. राज्य स्तरिय समितीत, संबंधित जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. सदर निवड झालेल्या संस्थांची प्रत्यक्ष पडताळणीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

## ५.६ अंतिम निवड:

- प्राप्त झालेल्या प्रस्तावांना अंशतः / पूर्णतः रद्द करण्याचे, सुधारणेसह मंजुर करण्याचे अधिकार ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन, राज्य कार्यालयाकडे राखीव असतील.

## ५.७ करारनामा:

- निवड झालेली समुदाय आधारित संस्था व ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन, यांच्यामध्ये प्रकल्प अंमलबजावणी साठी, प्रकल्पाच्या अटी व शर्तींच्या पालनाबाबत स्वतंत्रपणे करारनामा (अॅग्रीमेंट) केला जाईल.

**संपूर्ण प्रक्रिया कालबद्ध मर्यादेत पूर्ण करण्याची जबाबदारी सर्व संबंधितांवर राहील.**

# परिशिष्ट – १: मिशन महाग्राम व १००० गाव विकास कार्यक्रमातील व्हीएसटीएफ ची गावे

ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (VSTF) च्या फेज १ आणि २ मध्ये समाविष्ट असलेल्या गावांची यादी खालील प्रमाणे आहे

**जिल्हा निहाय गोषवारा -**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकूण ग्रा.पं. संख्या | एकूण गावांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | **लातूर** | अहमदपूर | ११ | १७ |
| | | औसा | ११ | १३ |
| | | जळकोट | ०७ | ०९ |
| | | **३ तालुके** | **२९** | **३९** |
| २ | **गडचिरोली** | गडचिरोली | ८ | १२ |
| | | आरमोरी | एकही ग्रा.प.समाविष्ट नाही. | एकही गाव समाविष्ट नाही |
| | | **२ तालुके** | **८** | **१२** |
| ३ | **सोलापूर** | माढा | ६ | ६ |
| | | उत्तर सोलापूर | ३ | ३ |
| | | दक्षिण सोलापूर | एकही ग्रा.प.समाविष्ट नाही. | एकही गाव समाविष्ट नाही. |
| | | मोहोळ | एकही ग्रा.प.समाविष्ट नाही. | एकही गाव समाविष्ट नाही |
| | | **४ तालुके** | **९** | **९** |
| ४ | **धाराशिव** | तुळजापूर | ३ | ४ |
| | | **१ तालुका** | **३** | **४** |
| **एकूण** | **४ जिल्हे** | **१० तालुके** | **४९** | **६२** |

वरील गोषवाऱ्यानुसार ग्राम सामाजिक परिवर्तन फ़ाउंडेशन मध्ये समाविष्ट असलेल्या गाव व जिल्हे यांची सविस्तर यादी.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | फेज | ग्रामपंचायत | समाविष्ट गावे |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **लातूर** | **अहमदपूर** | फेज १ | धसवाडी | धसवाडी |
| २ | | | | लेंडेगाव | लेंडेगाव, वैरागड, बोरगाव खु., |
| ३ | | | | नांदुरा खु. | नांदुरा खु. |
| ४ | | | | सोरा | सोरा, गवांडवाडी |
| ५ | | | | तळेगाव | तळेगाव |
| ६ | | | | येस्तार | पार, येस्तार |
| ७ | | | फेज २ | अंधोरी | अंधोरी |
| ८ | | | | हगदळ | हगदळ |
| ९ | | | | मावलगाव | मावलगाव |
| १० | | | | रुद्दा | रुद्दा |
| ११ | | | | सुनेगावसेंद्री | सुनेगाव, सेंद्री, सेनई |
| | | | | **११** | **१७** |
| १२ | | **औसा** | फेज १ | पारधेवाडी | पारधेवाडी |
| १३ | | | | उत्का | उत्का तांडा, उत्का |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | फेज | ग्रामपंचायत | समाविष्ट गावे |
|---|---|---|---|---|---|
| १४ | | | फेज २ | अशीव | अशीव |
| १५ | | | | किल्लारी | किल्लारी, किल्लारवाडी |
| १६ | | | | बाणेगाव | बाणेगाव |
| १७ | | | | जवळगा पोम. | जवळगा पोम. |
| १८ | | | | लामजना | लामजना |
| १९ | | | | चलबुर्गा | चलबुर्गा |
| २० | | | | दापेगाव | दापेगाव |
| २१ | | | | कवळी | कवळी |
| २२ | | | | मंगरुळ | मंगरुळ |
| | | | | **११** | **१३** |
| २३ | | **जळकोट** | फेज २ | चेरा | चेरा |
| २४ | | | | हावरगा | डोमगाव, हावरगा, जिरगा |
| २५ | | | | होकर्णा | होकर्णा |
| २६ | | | | शेलदरा | शेलदरा |
| २७ | | | | उमरदरा | उमरदरा |
| २८ | | | | उमरगा रेतू | उमरगा रेतू |
| २९ | | | | येलदरा | येलदरा |
| | | | | **७** | **९** |
| | | | **३** | **२९** | **३९** |
| | | | | | |
| **३०** | **गडचिरोली** | **गडचिरोली** | **फेज १** | **आंबेशिवणी** | **आंबेशिवणी** |
| **३१** | | | | चुरचुरा माल | चुरचुरा चक, चुरचुरा माल, कु-हाडी, महाडवाडी |
| **३२** | | | | दिभणा माल | दिभणा माल |
| **३३** | | | | जेप्रा | जेप्रा, राजागाटा माल |
| **३४** | | | | खुर्सा | खुर्सा |
| **३५** | | | | नागरी | नागरी |
| **३६** | | | | पुळखळ | पुळखळ |
| **३७** | | | | साखरा | साखरा |
| | | **आरमोरी** | फ़ेज १ व २ | निरंक | निरंक |
| | | **१** | | **८** | **१२** |
| | | | | | |
| **३८** | **सोलापूर** | **माढा** | फेज १ | अकुलगाव | अकुलगाव |
| **३९** | | | | भेंड | भेंड |
| **४०** | | | फेज २ | बिटरगाव | बिटरगाव |
| **४१** | | | | मुंगशी | मुंगशी |
| **४२** | | | | रोपले कव्हे | रोपले कव्हे |
| **४३** | | | | शिंगेवाडी | शिंगेवाडी |
| | | | | ६ | ६ |
| **४४** | | **उत्तर सोलापूर** | फेज १ | बेलाटी | बेलाटी |
| **४५** | | | | हिरज | हिरज |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | फेज | ग्रामपंचायत | समाविष्ट गावे |
|---|---|---|---|---|---|
| **४६** | | | | पाथरी | पाथरी |
| | | | | ३ | ३ |
| | | **दक्षिण सोलापूर** | १ व २ | निरंक | निरंक |
| | | **मोहोळ** | १ व २ | निरंक | निरंक |
| | | | **२** | **९** | **९** |
| | | | | | |
| **४७** | **धाराशिव** | **तुळजापूर** | फेज २ | दिंडेगाव | दिंडेगाव, तेलारनगर |
| **४८** | | | | कसई | कसई |
| **४९** | | | | मंगरुळ | मंगरुळ |
| | | **१** | | **३** | **४** |
| | **४ जिल्हे** | **१० तालुके** | | **४९** | **६२** |

**महत्त्वाची नोंद:** नमूद केलेल्या १० तालुक्यांपैकी (सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर, मोहोळ आणि गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी) या ३ तालुक्यांची नव्याने निवड झालेली आहे.ज्यांचा समावेश व्ही एस टी एफ़ च्या टप्पा १ व २ मध्ये नाही.

# महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास व पंचायत राज विभाग
# ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन

"आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण" प्रकल्पा अंतर्गत

## "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठी समुदाय आधारित संस्थांनी करावयाचा अर्ज

# परिशिष्ट -२: "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविण्यासाठीच्या समुदाय आधारित संस्थेने करावयाचा अर्ज

**"आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण" प्रकल्प अंतर्गत "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविणे** या प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक गट/ शेतकरी उत्पादक कंपनी / स्वयंसहाय्यता गट यांनी करावयाचा अर्ज

---

प्रति,

तालुका कृषी अधिकारी,
तालुका
जिल्हा

| | |
|---|---|
| अर्जदार समुदाय आधारित संस्थेचे नाव: | |
| संचालकाचे नाव: | |
| संपर्क क्रमांक: | |
| संस्थेचा पत्ता: | |

महोदय,

**"आकांक्षित आणि शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण" प्रकल्प अंतर्गत "कृषी अवजार बँक" (कस्टम हायरिंग सेंटर) घटक राबविणे** या प्रकल्पांतर्गत निवड होणेसाठी खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर करत आहोत.

संस्थेने द्यावयाची माहिती -

| अ.क्र. | तपशील/घटक | समुदाय आधारित संस्थेची माहिती |
|---|---|---|
| १. | समुदाय आधारित संस्थेचे नाव व पत्ता | |
| २. | समुदाय आधारित **संस्थेचा प्रकार**<br>(महिला स्वयं सहाय्यता गट, शेतकरी गट , शेतकरी उत्पादक कंपनी, प्रभाग संघ (CLF), ग्राम संघ (VO), समुदाय संचलित संसाधन केंद्र (CMRC) इ. | |

| अ.क्र. | तपशील/घटक | समुदाय आधारित संस्थेची माहिती | |
|---|---|---|---|
| | पैकी कोणत्या प्रकारात मोडते ते नमूद करा.) | | |
| ३. | शासनाच्या कोणत्या विभाग अंतर्गत संस्थेची नोंदणी झाली आहे त्या विभागाचे नाव – (उदा.कृषी-आत्मा, माविम, एम.एस.आर.एल.एम./उमेद इत्यादी) | | |
| ४. | संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक<br>**(सोबत संस्था नोंदणी प्रमाणपत्र जोडावे)** | नोंदणी क्रमांक:- | |
| | | नोंदणी दिनांक:- | |
| ५. | संस्थेचे कार्यक्षेत्र (गावांची संख्या व तालुक्याचे नाव)<br>**(सोबत संस्थेचे कार्यक्षेत्र तालुका निहाय गावांची यादी जोडावी)** | गावांची संख्या | |
| | | तालुक्याचे नाव | |
| ६. | संस्थेच्या संचालकांची संख्या | स्त्री | |
| | | पुरुष | |
| | | एकूण | |
| ६.१ | संचालक मंडळात एका पेक्षा अधिक व्यक्ती एकाच कुटुंबातील आहेत का ? होय/ नाही | | |
| ७. | संस्थेची एकूण सभासद संख्या (सभासदांची साक्षांकित यादी जोडावी) | स्त्री | |
| | | पुरुष | |
| | | एकूण | |
| ८. | सभासदांपैकी अल्प भूधारक व अत्यल्प भू धारक असल्यास त्यांची संख्या लिहावी अन्यथा शून्य लिहावे. | अत्यल्प भूधारक ( ० ते १ हेक्टर)- | |
| | | अल्प भू धारक (१ ते २ हेक्टर)- | |
| | | भूधारक (२ हेक्टरपेक्षा जास्त)- | |
| | | भूमिहीन- | |
| | | एकूण सभासद- | |

| अ.क्र. | तपशील/घटक | समुदाय आधारित संस्थेची माहिती | |
|---|---|---|---|
| ९. | सभासदांपैकी, अनु. जाती व अनु. जमातीच्या सभासदांची संख्या | अनु. जाती – | |
| | | अनु.जमाती – | |
| १०. | मुख्य प्रवर्तकाचे नाव व संपर्क | | |
| ११. | संस्थेचा ई-मेल | | |
| १२. | संस्थेच्या नियमित सभा/ बैठका होतात का व त्याचे इतिवृत्त आहे का?<br>(मागील ३ सभा/ बैठका इतिवृत्ताची प्रत जोडावी) | होय / नाही<br>होय असल्यास इतिवृत्त जोडावे. | |
| १३. | संस्थेने आतापर्यंत कोणकोणते प्रकल्प राबवले आहेत ? | | |
| १४. | संस्थेचे कृषी अवजार सेवा केंद्र (कस्टम हायरिंग सेंटर) आहे का ? असल्यास, त्यात सध्या कोण कोणती अवजारे / यंत्रे उपलब्ध आहेत ? | होय / नाही<br>असल्यास नमूद करा- | |
| १५. | संस्थेला शासनाच्या कोणत्या योजनेतुन आर्थिक लाभ मिळाला आहे का ?<br>असल्यास त्याचा तपशील लिहा – योजनेचे नाव –<br>लाभ मिळाल्याचे वर्ष -<br>शासन विभाग -<br>मिळालेली मदत –<br>आर्थिक स्वरुपात -<br>भौतिक स्वरुपात –<br>त्याची सध्याची स्थिती- | योजनेचे नाव –<br>शासन विभाग –<br>लाभ मिळाल्याचे वर्ष –<br>मिळालेली मदत – आर्थिक स्वरुपात –<br>भौतिक स्वरुपात –<br>त्याची सध्याची स्थिती-<br>(एका पेक्षा अधिक लाभ मिळाले असल्यास वेगळे पान जोडावे ) | |
| १६. | संस्थेच्या संचालकांनी घेतलेल्या प्रशिक्षणांचा तपशील – | प्रशिक्षणार्थी संख्या –<br>कोणते प्रशिक्षण घेतले (प्रशिक्षण विषय)?- | |

| अ.क्र. | तपशील/घटक | समुदाय आधारित संस्थेची माहिती |
|---|---|---|
| | | कधी घेतले ?-<br><br>कुठे घेतले ? -<br><br>कोणा मार्फ़त घेतले ? - |
| १७. | संस्थेला स्मार्ट प्रकल्पातून अनुदान मिळाले आहे का ?<br>असल्यास, | संस्थेला स्मार्ट प्रकल्पातून अनुदान मिळाले असल्यास,<br>प्रकल्पाचे नाव-<br><br>मंजुरीचे वर्ष –<br><br>मंजुर अनुदान रक्कम –<br><br>प्राप्त रक्कम –<br>प्रकल्पात घेतलेले लाभ -<br>नसल्यास "नाही" असे नमूद करावे |
| १८. | संस्थेला कृषी अवजारे सेवा केंद्र व्यवस्थापनाचा अनुभव आहे का? | होय / नाही |
| १९. | आपली संस्था VSTF च्या १००० गावांचा विकास प्रकल्प किंवा मिशन महाग्राम मध्ये समाविष्ट आहे का?<br>नसल्यास, किमान ५० टक्के भागधारक हे VSTF च्या १००० गावांचा विकास प्रकल्प किंवा मिशन महाग्राम मध्ये समाविष्ट गावातील रहिवासी आहेत का ? असल्यास गावांचा तपशील - | होय/ नाही |
| २०. | संस्थेचे खेळते भांडवल (Working Capital) आहे का?<br>असल्यास किती आहे? लेखापरीक्षण अहवाल नसल्यास का नाही त्याची कारणे नमूद करा. | होय / नाही<br><br>असल्यास लेखापरीक्षण अहवाल जोडावा- |

| अ.क्र. | तपशील/घटक | समुदाय आधारित संस्थेची माहिती |
|---|---|---|
| २१. | मागील वर्षाचे लेखापरीक्षण (Audit) पूर्ण झाले आहे का ?<br><br>काही आक्षेप आले असल्यास आक्षेपपूर्तता झाली आहे का?<br><br>**(संस्थेचा २०२४-२५/२०२५-२६ चा ताळेबंद व लेखा परिक्षण अहवाल जोडावा.)** | होय / नाही |
| २२. | संस्था हिशोब कोणत्या पद्धतीने ठेवते (लेखी स्वरुपात / डिजिटल स्वरुपात) डिजिटल स्वरुपात असल्यास कोणते सॉफ़्टवेअर वापरते ? | |
| २३. | संस्थेकडे स्वतःची किंवा भाड्याची इमारत / जागा आहे का ? | आहे/ नाही<br><br>भाडे तत्वावर आहे- |
| २४. | संस्थेकडे संगणक, इंटरनेट सुविधा आहे का? | होय/ नाही<br><br>नसल्यास पूर्तता करण्यास तयार आहे का- |
| | | |
| २५. | **"प्रस्तावित": कृषी अवजारे सेवा केंद्राचा तपशील** | |
| २५.१ | प्रस्तावित कृषि अवजारे सेवा केंद्राचा एकूण खर्च (रु.) | |
| २५.२ | प्रस्तावित कृषि अवजारे सेवा केंद्राचे ठिकाण | गाव____________तालुका______ जिल्हा________ |
| २५.३ | प्रस्तावित शेडची व्यवस्था | स्वतःचे________________ भाड्याचे __________ |
| २५.४ | संस्थेचे शेड उपलब्ध नसल्यस पर्यायी व्यवस्था? | |
| २५.५ | संस्थेकडे सध्या उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाची संख्या किती आहे? | तांत्रिक -_________ अतांत्रिक -_________ |
| २५.६ | संस्थेकडे सध्या उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाची संख्या किती आहे? | हंगामी - ________कायमस्वरूपी-________ |
| २५.७ | प्रस्तावित प्रकल्पात आवश्यक असणा-या साधनांचा तपशील | |

| अ.क्र. | तपशील/घटक | | समुदाय आधारित संस्थेची माहिती | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अवजारे/ उपकरणे/ संयंत्राचे नाव | क्षमता/ Technical Specifications | आवश्यक संख्या | अंदाजित रक्कम (रु.) | अवजारे/ उपकरणे / सयंत्रांची उपयोगिता |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| | | | | | |
| | एकूण | | | | |
| २५.८ | प्रकल्प आराखडयामध्ये खालील बाबी आवश्यक आहेत. | | | | |
| अ) | (संस्थेची आधीची अवजार बँक असल्यास) सध्याची कृषी अवजाराची स्थिती | | चांगली<br>बंद<br>लागू नाही | | |
| आ) | प्रस्तावित प्रकल्पाची आवश्यकता का आहे ? | | | | |
| इ) | भाडेतत्वावर कृषी अवजारे देणेबाबतचे संस्थेचे धोरण | | | | |
| ई) | संस्थेस प्राप्त होणाऱ्या साधनांची देखभाल, दुरुस्ती बाबतचे संस्थाचे नियोजन काय आहे.? | | | | |

| अ.क्र. | तपशील/घटक | समुदाय आधारित संस्थेची माहिती |
| --- | --- | --- |
| उ) | साधनांची / यंत्रे यांची नोंदवही (आवक/ जावक )ठेवणे व ते अद्ययावत राहतील यासाठीचे नियोजन | |
| **२६** | **दस्त सूची** | |
| | सोबत खालील दस्तऐवज जोडावे, . :-<br>१. नोंदणी प्रमाणपत्र – होय / नाही<br>२. सभासदांची यादी मध्ये नाव, वय, लिंग, जात (प्रवर्ग), संपर्क, आदी बाबींचा तपशील– होय / नाही<br>३. मागे झालेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त – होय / नाही<br>४. मागील आर्थिक वर्षाचा जमखर्चाचा ताळेबंद(Balance sheet) – होय / नाही<br>५. नजीकच्या काळात झालेल्या लेखापरीक्षणाचा अहवाल – होय / नाही<br>६. या पुर्वी या संदर्भात कोणात्याही योजनेचा लाभ घेतला असल्यास त्याची माहिती. – होय / नाही<br>७. व्यवसाय आराखडा – होय / नाही<br>८. संस्थेमध्ये समाविष्ट असलेल्या तालुका निहाय गावांची यादी | |

“आम्ही याद्वारे घोषित करतो की, वर नमूद केलेली सर्व माहिती अचूक व सत्य आहे. सदर अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून, आज दिनांक __________ रोजी ______________ येथे अर्ज सादर करीत आहोत.”

ठिकाण- अर्जदार संस्था संचालक सही व शिक्का

# परिशिष्ट – ३: शेती उत्पादन खर्चात बचत करणे आणि कृषी अवजारे वाजवी दरात उपलब्ध करून देण्याबाबत हमीपत्र

प्रति,

**तालुका कृषी अधिकारी**,

तालुका: .......................... जिल्हा: .............................

**विषय: - कृषी अवजार बँक: प्रकल्पांतर्गत तांत्रिक उद्दिष्ट्ये पूर्ततेबाबत हमीपत्र.**

मी/आम्ही, ......................................................................., या हमीपत्राद्वारे खालील बाबींचे पालन करण्याची लेखी हमी देत आहोत:

१. **शेती उत्पादन बचत:** आमच्या संस्थेमार्फत निवडलेल्या **किमान १०० सभासद शेतक-यांच्या** वार्षिक शेती उत्पादन खर्चात तांत्रिक सुधारणा आणि यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून **किमान रु. ६,००० इतकी बचत** करण्याचे उद्दिष्ट आम्ही साध्य करू.
२. **वाजवी दरात सेवा:** आमच्या संस्थेला प्राप्त होणारी कृषी अवजारे, उपकरणे व संयंत्रे ही सभासदांना व संस्थेच्या भागधारकांना कमीत कमी प्रचलित बाजार दराच्या किमान १० % पर्यंत सूट (कमी दराने) देण्यात येईल. असे न झाल्यास समुदाय आधारित संस्थे कडील कृषी अवजारे, उपकरणे व संयंत्रे ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन इतर संस्थांना उपलब्ध करून देऊ शकेल व त्यास संस्था कोणतीही हरकत व आक्षेप घेणार नाही.
३. **अटी व शर्तींचे पालन:** प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांमधील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करणे आमच्या संस्थेवर बंधनकारक असेल. यामध्ये काही कसूर झाल्यास किंवा मार्गदर्शक सूचनेप्रमाणे काम पूर्ण न केल्यास आम्हाला मिळणारे अनुदान देय राहणार नाही तसेच संस्थेला उपलब्ध करून देण्यात आलेली कृषी अवजारे, उपकरणे व संयंत्रे ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन इतर संस्थांना उपलब्ध करून देऊ शकेल याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे.
४. **तपासणी व सहकार्य:** प्रकल्पाचे अधिकारी किंवा प्राधिकृत व्यक्ती जेव्हा प्रकल्पाच्या किंवा अवजारांच्या तपासणीसाठी येतील, तेव्हा त्यांना पूर्ण सहकार्य करण्याची आणि सर्व आवश्यक अभिलेख (उदा. यंत्र वापराचे लॉग बुक, साठा नोंद वही, लेखा विषयक दस्तावेज, आवक-जावक रजिस्टर, फोटो, प्रगती अहवाल) उपलब्ध करून देण्यास आमची संमती राहील.
५. **गैरवापर व वसुली:** प्रकल्पांतर्गत मिळालेल्या अनुदानाचा किंवा खरेदी केलेल्या यंत्रसामग्रीचा गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास, मिळालेले **अनुदान सव्याज वसूल** केले जाईल, याची आम्हाला स्पष्ट जाणीव आहे.

वरील सर्व माहिती आणि दिलेल्या हमी आमच्या समजुतीप्रमाणे बरोबर व खऱ्या आहेत.

**स्थळ:** ...........................
**दिनांक:** ...........................
**(संस्थेचा शिक्का)**

..............................................................

**अध्यक्ष/सचिव/मुख्य प्रवर्तकाचे नाव व सही**

**(शेतकरी उत्पादक कंपनी / गट / संस्था)**

**टीप:** हे हमीपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

## परिशिष्ट – ४: क्षमतावाढीसाठीची शिबिरे व प्रशिक्षणास उपस्थित राहण्याबाबत हमीपत्र

प्रति,
**तालुका कृषी अधिकारी**,
तालुका: .......................... जिल्हा: .............................

**विषय: कृषी अवजार बँक: प्रकल्पांतर्गत आयोजित प्रशिक्षणांना उपस्थित राहण्याबाबत हमीपत्र.**

मी/आम्ही, ........................................................... (संस्थेचे नाव), या हमीपत्राद्वारे खालील बाबींची ग्वाही देतो की:

१. **प्रशिक्षणास उपस्थिती:** आमच्या संस्थेची निवड झाल्यास, संस्थेच्या कार्यक्षमता वाढीकरिता 'ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन' किंवा प्रकल्पाच्या तांत्रिक भागीदारांमार्फत वेळोवेळी आयोजित केल्या जाणाऱ्या सर्व **क्षमतावाढीसाठीच्या शिबिरे व प्रशिक्षणास** संस्थेचे प्रतिनिधी/संचालक हजर राहतील.
२. **सहभागितेची सुनिश्चिती:** प्रकल्पांतर्गत होणाऱ्या पायाभूत सर्वेक्षण (Baseline Survey), अंतिम सर्वेक्षण आणि तांत्रिक मार्गदर्शन सत्रांमध्ये संस्थेच्या सर्व सभासदांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याची जबाबदारी आमची असेल.
३. **अंमलबजावणी:** प्रशिक्षणात मिळालेल्या तांत्रिक ज्ञानाचा आणि मार्गदर्शक सूचनांचा वापर करून प्रकल्प यशस्वीपणे राबविण्याचे आम्ही मान्य करतो.
४. **अनिवार्यता:** प्रशिक्षणास गैरहजर राहिल्यास किंवा प्रकल्पाच्या तांत्रिक निकषांचे पालन न केल्यास, संस्थेला मिळणाऱ्या अनुदानावर किंवा पात्रतेवर होणाऱ्या परिणामांची आम्हाला पूर्ण जाणीव आहे.

**स्थळ:** .......................... **दिनांक:** ..........................

**(संस्थेचा शिक्का)**

............................................................

**अध्यक्ष/सचिव/मुख्य प्रवर्तकाची सही व नाव**
**(शेतकरी उत्पादक कंपनी / गट / संस्था)**

# परिशिष्ट – ५: मागील ३ वर्षात कृषी अवजार बँक घटकाचा लाभ घेतला नसल्याबाबतचे हमीपत्र

प्रति,
**तालुका कृषी अधिकारी**,
तालुका: .......................... जिल्हा: .............................

**विषय: समुदाय आधारित संस्थेने मागील ३ वर्षात, शासनाच्या कोणत्याही योजनेतून "कृषी अवजार बँक" या घटकाचा लाभ घेतला नसल्याबाबतचे हमी पत्र**

मी/आम्ही, ........................................................... (संस्थेचे नाव), या हमीपत्राद्वारे ग्वाही देतो की, मागील ३ वर्षात आमच्या समुदाय आधारित संस्थेने, "कृषी अवजार बँक" या घटकाचा शासनाच्या इतर कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेला नाही. सदरची बाब चुकिची आढळून आल्यास आमची समुदाय आधारित संस्था या योजनेतून रद्द होईल व त्यास आमची हरकत वा आक्षेप असणार नाही. असे हमीपत्र आज रोजी दिले असे.

**स्थळ:** .......................... **दिनांक:** ..........................

**(संस्थेचा शिक्का)**

**..................................................**
**अध्यक्ष/सचिव/मुख्य प्रवर्तकाची सही व नाव**
**(शेतकरी उत्पादक कंपनी / गट / संस्था)**

# परिशिष्ट ६: अर्ज सादर करण्यासाठीच्या अटी व शर्ती

१. समुदाय आधारित संस्थेने अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शक सूचना काळजीपूर्वक वाचून, अर्ज करावा.
२. कोणताही अर्ज अपूर्ण किंवा माहिती भरली नसल्यास अर्ज रद्द होऊ शकतो.
३. समुदाय आधारित संस्था द्वारे परिपूर्ण प्रस्ताव तीन प्रतीत सादर करण्यात यावा, अन्यथा तो ग्राह्य धरला जाणार नाही.
४. एक समुदाय आधरित संस्था फक्त एकच प्रस्ताव सादर करण्यास पात्र आहे. एकाहून अधिक प्रस्ताव सादर केल्यास त्या संस्थेचे सर्व प्रस्ताव रद्द करण्यात येतील.
५. परिशिष्ट क्र. ३ ते ५ मधील हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
६. अंतिम पात्रता ठरवण्याचा अधिकार सर्वस्वी ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन, राज्य कार्यालय मुंबई यांचा राहील.
७. प्राप्त निधी हा त्याच बाबीवर खर्च करण्यात यावा.
८. संस्थेने दिलेली सर्व माहिती व कागदपत्रे सत्य असल्याची जबाबदारी समुदाय आधारित संस्थेची राहील.
९. चुकीची, अपूर्ण किंवा खोटी माहिती आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.
१०. कोणत्याही प्रकारचा खोटा दावा, बनावट कागदपत्रे किंवा दिशाभूल करणारी माहिती तपासणीत आढळल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल.
११. परिसंस्थाची जागा मालकी बाबत पुरावा जोडावा.उतारा/ भाडेकरारनामा.
१२. नमूद वेळेत प्रस्ताव दाखल करण्यात यावा. विलंबाने दाखल केलेले प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत.
१३. समुदाय आधारित संस्थेने प्रस्ताव गुणांकन प्रपत्रानुसार सर्व कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडावेत.

# परिशिष्ट ७: अर्ज छाननीसाठीचे गुणांकन

## समुदाय आधारित संस्था (CBO) पात्रता व निकष: गुणांकन पत्रक

| अ.क्र. | प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर / आवश्यक पुरावा | गुणांकन निकष | कमाल गुण | प्राप्त गुण | तपशील लिहावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | **प्राथमिक पात्रता व निकष** | | | | | |
| १ | १.१ | समुदाय आधारित संस्था VSTF च्या १००० गावांचा विकास प्रकल्प किंवा मिशन महाग्राम मध्ये समाविष्ट आहे का किंवा मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प 'स्मार्ट' (SMART) प्रकल्पातून अनुदान प्राप्त आहे का ? | होय / नाही<br><br>संबंधित बाबींची पडताळणी करून अभिप्राय स्वयंस्पष्टपणे तपशिलामध्ये लिहावा | होय = १० गुण;<br>नसल्यास = ५ गुण | १० | | |
| २ | १.२ | संस्था पूर्णपणे महिला संचलित आहे का? | होय / नाही / संस्थात्मक (संचालक मंडळ यादी) पुरावा जोडले आहे का हे तपासून तपशिलामध्ये अभिप्राय लिहावा | स्त्री प्रमाण<br>९१%ते १००% = १० गुण;<br>८१% ते ९०% = ८ गुण<br>५१% ते ८०% = ६ गुण<br>५०% पेक्षा कमी = ५ गुण | १० | | |
| | | | | | | | |
| | **प्राथमिक पात्रता व निकष** | | | | **२०** | | |
| | २ | **संस्थात्मक आणि प्रशासकीय बाबी** | | | | | |
| ३ | २.१ | एकूण सभासदांमध्ये स्त्रियांचे प्रमाण किती आहे? | स्त्री व पुरुष सभासदांची संख्या/टक्केवारी | **स्त्री प्रमाण**<br>९१%ते १००% = १० गुण;<br>८१% ते ९०% = ८ गुण<br>७१% ते ८०% = ६ गुण<br>६१% ते ७०% = ४ गुण<br>५१% ते ६०% = २ गुण;<br>०% ते ५०% पेक्षा कमी = ० गुण | १० | | |
| ४ | २.२ | सभासदांमध्ये अनुसूचित जाती/जमाती मधील सभासद आहेत का? | होय / नाही /<br>सभासद माहिती पडताळणी करून अभिप्राय स्वयंस्पष्टपणे तपशिलामध्ये लिहावा | असल्यास = ५ गुण;<br>नसल्यास = ० गुण | ५ | | |
| ५ | २.३ | संस्थेच्या नियमित सभा/बैठका होतात का? | बैठका होत असल्यास दिनांक १ एप्रिल २०२५ नंतरच्या किमान ३ बैठकांचे इतिवृत्त सोबत जोडले आहे का याची पडताळणी करून अभिप्राय स्वयंस्पष्टपणे तपशिलामध्ये लिहावा | ३ बैठकांचे इतिवृत्त सोबत जोडले असल्यास = ५ गुण;<br>३ पेक्षा कमी बैठकांचे इतिवृत्त सोबत जोडले असल्यास = २ गुण;<br>**इतिवृत्त सोबत जोडले नसल्यास = ० गुण** | ५ | | |
| | | **संस्थात्मक आणि प्रशासकीय बाबी** | | | **२०** | | |
| | ३ | **आर्थिक आणि तांत्रिक क्षमता** | | | | | |
| ६ | ३.१ | मागील वर्षाचे लेखापरीक्षण (Audit) पूर्ण झाले आहे का? | Audit Report सन २०२४-२५/२०२५-२६ पुरावा सोबत जोडला आहे का याची पडताळणी करून अभिप्राय स्वयंस्पष्टपणे तपशिलामध्ये लिहावा | किमान एक वर्षाचे लेखापरीक्षण पूर्ण = १० गुण;<br>लेखापरीक्षण त्या आर्थिक वर्षात लागू नसल्यास= २ गुण | १० | | |

| अ.क्र. | प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर / आवश्यक पुरावा | गुणांकन निकष | कमाल गुण | प्राप्त गुण | तपशील लिहावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लेखापरीक्षण लागू असून केले नसल्यास = ० गुण | | | |
| ७ | ३.२ | संस्थेचे खेळते भांडवल (Working Capital) आहे का? असल्यास किती आहे? | रक्कम नमूद करावी. याची पडताळणी करून अभिप्राय स्वयंस्पष्टपणे तपशिलामध्ये लिहावा. | असल्यास = ५ गुण;<br>नसल्यास = ० गुण.<br>नसल्यास कारणे नमूद करावीत | ५ | | |
| ८ | ३. ३ | शासकीय योजनांच्या माध्यमातून कोणत्या प्रकल्पाची अंमलबजावणी केली आहे का? | होय / नाही<br>शासकीय योजना राबविली असल्यास याची पडताळणी करून अभिप्राय स्वयंस्पष्टपणे तपशिलामध्ये लिहावा. | असल्यास = ५ गुण;<br>नसल्यास = ० गुण | ५ | | |
| | | | | **आर्थिक आणि तांत्रिक क्षमता** | **२०** | | |
| | ४ | **व्यवसाय आणि अंमलबजावणी** | | | | | |
| ९ | ४.१ | स्वतःची किंवा भाड्याची कार्यालयीन इमारत सुविधा आहे का? | होय / नाही / सुविधा तपशील | असल्यास = १० गुण;<br>नसल्यास = ० गुण | १० | | |
| १० | ४.२ | नियोजित व्यवसायासाठी (CHC) संक्षिप्त प्राथमिक प्रकल्प अहवाल (PPR) तयार आहे का? | होय / नाही / PPR जोडावा | असल्यास = १० गुण;<br>नसल्यास = ० गुण | १० | | |
| ११ | ४.३ | सभासदांच्या उत्पादन खर्चात रु. ६,००० घट करण्याचे उद्दिष्ट गाठण्याचे हमी पत्र दिले आहे का? | होय / नाही /<br>समुदाय आधारित संस्थेने सभासदांना स्थानिक बाजारतील प्रचलित दरापेक्षा किमान १० % कमी दराने यंत्र सामग्री उपलब्ध करून देण्याचे हमी पत्र जोडले आहे का. | असल्यास = १० गुण;<br>नसल्यास = ० गुण | १० | | |
| १२ | ४.४ | यंत्रसामग्री ७५% ते ८०% कार्यक्षमतेने वापरण्याची लेखी हमी देण्यास तयार आहात का? | होय / नाही / लेखी हमी | असल्यास = १० गुण;<br>नसल्यास = ० गुण | १० | | |
| | | | | **व्यवसाय आणि अंमलबजावणी** | **४०** | | |
| | | | | **एकूण गुण** | **१००** | | |

| | | |
|---|---|---|
| प्रादेशिक समन्वयक/<br>जिल्हा कार्यक्रम समन्वयक,<br>ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन<br>सदस्य - सचिव | तालुका कृषी अधिकारी,<br>कृषी विभाग तथा सह अध्यक्ष | गट विकास अधिकारी तथा<br>अध्यक्ष तालुका अभियान परिषद,<br>ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन<br>अध्यक्ष |
| जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,<br>कृषी विभाग यांचे प्रतिनिधी- सदस्य | ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन<br>राज्य कार्यालयाचे प्रतिनिधी- सदस्य | विस्तार अधिकारी -कृषी, पंचायत समिती-<br>सदस्य |
| स्थळ: | | दिनांक |